19 MAY 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून पूर्ववत

## आतापर्यंत १६४ निकाल जाहीर : ऑनलाईन पर्याय नोंदविण्याची मुदत संपली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : तौक्ते चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीमुळे शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सोमवारी आणि मंगळवारी होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. या सत्रातील परीक्षा आज, बुधवारपासून पूर्ववत सुरू होणार आहे. त्याच्या पहिल्या दिवशी ५० पेपर होणार आहेत.

या हिवाळी सत्रातील परीक्षा दि. २२ मार्चपासून सुरू झाल्या आहेत. त्या ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे गेल्या दोन दिवसांतील परीक्षा स्थगित केल्या होत्या. त्यानंतर या सत्रातील परीक्षा बुधवारपासून ऑनलाईन आणि दिवसभरातील विविध सत्रांमध्ये होतील. बी. ए. सत्र तीन आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे ५० पेपर होणार आहेत.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी बी. एस्सी. सत्र पाच आणि सहा, बी. एस्सी. आयटी सत्र पाच आणि सहा या परीक्षांचे निकाल जाहीर केले. आतापर्यंत एकूण १६४ परीक्षांचे निकाल लावले आहेत. प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या परीक्षा दि. २५ मेपासून घेण्यात येणार आहेत. त्यासाठी ऑनलाईन परीक्षा देण्याचा पर्याय नोंदविण्याची मुदत दि. १५ मेपर्यंत होती. मात्र, नैसर्गिक आपत्तीमुळे ही मुदत मंगळवारपर्यंत वाढविली होती. स्थगित केलेल्या परीक्षा दि. २२ आणि २३ मे रोजी होणार आहेत, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठ कौशल्य, उद्योजकता विकास केंद्रातर्फे आजपासून ऑनलाईन व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांसाठी संशोधनपद्धती विषयावर दि. १९ मे पासून ऑनलाईन व्याख्यानमालेस प्रारंभ होणार आहे. ऑनलाईन व्याख्यानमालेंतर्गत 'संशोधन आराखडा तयार करणे' विषयावर डॉ. कृष्णा पाटील, 'संशोधन पेपर तयार करणे' विषयावर डॉ. सचिन सलगर, 'संशोधनात आयसीटीचा वापर' विषयावर डॉ. विद्यानंद खंडागळे, 'संशोधनात एसपीएसएसचा वापर' विषयावर डॉ. सुकुमार राजगुरू व 'संशोधन अहवाल लेखन' विषयावर प्रा. डॉ. ए. एम. गुरव मार्गदर्शन करणार आहेत. २३ मे पर्यंत व्याख्यानमाला चालणार आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

19 MAY 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## गुलमोहोरच्या पायघड्या...

कोल्हापूर : कोरोनाच्या वाढत्या चिंतेमुळे सगळीकडे शांतता दिसते आहे. मात्र शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागासमोर निसर्गाचा अविष्कार पहायला मिळाला. हे छायाचित्र टिपले आहे विद्यापीठाचे उद्यान अधीक्षक अभिजित जाधव यांनी.